महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पामधील कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवा पुढे सुरु ठेवण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृपमं१०१८ /प्र.क्र.१८१ /२१-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः कृपमं-१०१८/प्र.क्र.१८१/२१-स, दिनांक २४.१२.२०१८
२) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प यांचे पत्र क्र.एमएसीपी/पीसीयु/लेखा/१३०६/२०१९, दि.३१.०१.२०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाच्या समाप्तीनंतर प्रकल्पांतर्गत विहित घटकांवर झालेल्या पात्र खर्चाची प्रतिपूर्ती जागतीक बँकेकडे सादर करणे व पात्र खर्चाचे प्रतिपूर्तीचे दावे वित्त मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करणे, लेखापरिक्षण अहवाल सादर करणे तसेच संपादन पश्चात आढावा घेणे, प्रकल्पांच्या अंमलबजावणी अंतीमीकरण व निष्कर्शाबाबत अहवाल तयार करणे इत्यादी कामे पुर्ण करण्याकरीता दिनांक २०.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्पावरील कार्यरत सर्व कर्मचारी / अधिकारी, वैयक्तिक सल्लागार व करारावरील अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा दि. ३१.१०.२०१८ च्या पुढे दि. ३०.११.२०१८ पर्यंत सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पातील CAIMI कक्षातील ५ वैयक्तिक सल्लागारसह ५७ कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवा दि.२८.०२.२०१९ पर्यंत सुरु ठेवण्यास दि.२४.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासन मान्यता देण्यात आली आहे.

दिनांक २८.०२.२०१९ रोजी प्रकल्पाचे जागतिक बँकेकडील लेखाविषयक कामकाज जसे की, पीएफएस अहवाल, आययुएफआर अहवाल सादर करणे व त्याची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून प्राप्त करुन घेणे ही कामे संपणार आहेत. तथापी राज्य शासनाकडील लेखा विषयक कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रकल्पामध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे ८ शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्यासह कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले १० अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ३१.०३.२०१९ सुरु ठेवण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाअंतर्गत लेखा विषयक कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रकल्पामध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे खालील ८ शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्यासह कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले १० अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा प्रलंबीत कामे पूर्ण करुन प्रकल्प पूर्णता बंद करण्याची कार्यवाही पूढील मूदतीत करण्याच्या अटीच्या अधीन राहून दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत सुरु ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पामध्ये प्रतिनियुक्तीने कार्यरत व करारावरील अधिकारी/कर्मचारी यांचे मधून खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी वृंद यांची सेवा दिनांक ०१.०३.२०१९ ते दि. ३१.०३.२०१९ पर्यंत सुरु ठेवण्यात येत आहेत.

	प्रकल्प समन्वय कक्ष	
अ.क्र.	**पदनाम**	संख्या
१	प्रकल्प संचालक	१
२	मुख्य वित्त नियंत्रक	१
३	प्रशासकीय अधिकारी	१
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(कृषि पणन) (पणन मंडळ व NIPHT यांचेकडील प्रतिनियुक्तीवर असलेले अधिकारी/कर्मचारी)		
अ.क्र.	पदनाम	संख्या
१	प्रशासकीय अधिकारी	१
२	लेखाधिकारी	१
३	वरिष्ठ संपादन अधिकारी	१
४	सहाय्यक	२
प्रकल्प समन्वय कक्ष : करारावरील अधिकारी / कर्मचारी		
अ.क्र.	पदनाम	संख्या
१	लेखापाल	१
२	रोखपाल	१
३	मंत्रालयीन सहायक	१
४	सहाय्यक	१
५	शिपाई	२

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष : करारावरील अधिकारी / कर्मचारी		
अ.क्र.	पदनाम	संख्या
१	लेखापाल (पणन)	१
२	सहायक (पणन)	१
३	लेखापाल (कृषि)	१
४	लेखापाल (पशुसंवर्धन)	१

३. सदर शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौसं क्र. ३७७/१४३१ दि १५.०२.२०१९ व वित्त विभागाच्या अनौसं क्र. १५२/२०१९/व्यय-२ दिनांक २६.०२.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०२२८१६२८१३९९०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayant Baliram Bhoir

Digitally signed by Jayant Baliram Bhoir
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Cooperation, Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=33a892413bd2c105002f2acc67792c5931afb42987d31b0deb6c0181d19c74aa, serialNumber=33432a8e2e81dcab0518d2a6ca4f4f1d3dba7ca3247657527f52bef2a2aa29b2, cn=Jayant Baliram Bhoir
Date: 2019.02.28 16:31:23 +05'30'

(जयंत भोईर)

कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि /पणन/ पशुसंवर्धन/वित्त/नियोजन), मंत्रालय, मुंबई
२) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे
३) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
६) कार्यासन अधिकारी (१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) कार्यासन अधिकारी (व्यय-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) निवडनस्ती (२१-स)